सी.एन.आर.क्र. एम.एच.डी.एच.०४०००२०७२०२४

नि.दि. मु. क्र. ०९/२०२४ मधील नि.क्र.१६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विरुद्ध झालेला 'विना कैफीयत व म्हणणे' चा झालेला आदेश रद्द होवून खुलासा दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे कथन थोडक्यात असे की, प्रतिवादी क्र. २ व ३ हे वयस्कर असुन त्यांना फारसे चालता फिरता येत नाही. तसेच, प्रतिवादी क्र. १ हा दि. ०६.०५.२०२४ रोजी बैल गाडीवरुन पडुन त्याचे पायास फ्रॅक्चर झाल्याने त्याला दुखापतीमुळे चालता फिरता येत नव्हते. मागील तारखेस प्रतिवादी याने दिलेल्या माहितीप्रमाणे कैफियत तयार झाली परंतु वेळेत देता आली नाही. म्हणुन प्रतिवादी क्र. १ ते ३ हे मुदतीत खुलासा देवु शकले नाहीत. प्रतिवादींचे म्हणणे न ऐकुन घेतल्यास प्रतिवादींचे न भरुन येणारे नुकसान होईल. तसेच वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द झालेला दावा विना कैफीयत व म्हणणे चालविण्याचा आदेश रद्द होवुन कैफीयत दाखल करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विनंती करण्यात आली आहे की, त्यांचे विरुध्द झालेला विना कैफीयत व म्हणणेचा आदेश रद्द होवुन त्यांना कैफीयत दाखल करण्याची परवानगी मिळावी.

०३. प्रस्तुतच्या अर्जास वादीतर्फे तीव्र विरोध करण्यात आला आहे. वादीचा आक्षेप थोडक्यात असा की, प्रतिवादी यांना दि. ०१.०४.२०२४ रोजी समन्स लागलेनंतर विहित मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. अर्जातील कथने खोटी आहेत. सबब, वादीतर्फे विनंती की प्रस्तुतचा अर्ज खर्च रु. २०००/- सह नामंजुर करण्यात यावा.

०४. प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकनकरीता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विहीत मुदतीत कैफीयत सादर केली नसल्याने त्यांचेविरुध्द दि. १८.०७.२०२४ रोजी विना कैफियत व म्हणणे चा आदेश पारीत करण्यात आला होता. नि. क्र. १८ सोबत दाखल केलेल्या वैद्यकीय कागदपत्रावरुन प्रतिवादी क्र. १ याचा दि. ०६.०५.२०२४ रोजी अस्थीभंग झाल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. परंतु, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना समन्स लागू झाल्यापासून उपरोक्त आदेशा पारीत होईपर्यंतचा एकुण कालावधी पाहता, अर्जात नमूद केलेले कारण पुर्णतः संयुक्तिक वाटत नाही. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना कैफियत दाखल करण्याकरीता पुरेशी संधी देण्यात आली होती. मात्र, असे असले तरी न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत दाव्याचा गुणदोषांवर कायमपणे निकाल होण्याकरीता, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची कैफीयत व म्हणणे अभिलेखावर असणे आवश्यक आहे, असे माझे मत आहे. नैसर्गिक न्याय तत्वांच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना प्रस्तुत कामी म्हणणे मांडण्यास संधी देणे हे न्यायदानाच्या दृष्टीने अपरिहार्य आहे. प्रतिवादी १ ते ३ यांना तशी संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही. उलटपक्षी, प्रकरण कायमपणे गुणदोषांवर निकाली होण्यास मदतच होईल व निष्कारण न्यायालयीन प्रकरणांची गुंतागुंत देखील वाढणार नाही. वादीस होणाऱ्या त्रासाचा विचारकरीता, वादीस योग्य तो खर्च देवून न्यायाचा समतोल राखता येईल असे माझे मत आहे. सबब, मी वरील चर्चित कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :-

**<u>- आदेश -</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.१६ हा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रत्येकी वादीला रु.३००/- (रक्कम रुपये तीनशे) इतका खर्च पुढील नेमले तारेखस किंवा तत्पूर्वी देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीस वर म्हणल्याप्रमाणे दिल्यानंतर, त्यांची कैफीयत अभिलेखावर घेण्यात येईल.

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2024.10.18 11:44:23 +0530

ठिकाण : दोंडाईचा (आदित्य घ. नाईक)
दिनांक : १७/१०/२०२४ दिवाणी न्यायाधीश (क-स्तर), दोंडाईचा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – गणेश साईनाथ अहिरे (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नांव | – दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – १८.१०.२०२४ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.